K. S. Wani Memorial Trust

NEWS LETTER

Editorial Committee :
Prof. Dr. Shobha Shinde (Chief Editor)
Ms. Vaishali Songire (Asst. Editor) &
Prof. Mr. Prasad Puranik (Co-Editor)

Volume No.28 / January – March 2025 / K. S. Wani Memorial Trust Reg. No.E352

# Printing Institute News

## का. स. वाणी संस्थेतील डिप्लोमा प्रिंटींगच्या विद्यार्थ्यांची कॅम्पसद्वारा निवड

का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्थेतील प्रिंटींग डिप्लोमाच्या विद्यार्थ्यांसाठी वापी (गुजरात) येथील मल्टिनॅशनल कंपनी ई.पी.एल.लिमिटेड व हैद्राबाद येथील श्रीनाथ रोटोपॅक प्रा. लि. या दोन्ही कंपन्यांनी कॅम्पस इंटरव्ह्यूचे आयोजन केले होते. यात वापी येथील ई.पी.एल. कंपनीने १२ विद्यार्थ्यांची व हैद्राबाद येथील श्रीनाथ रोटोपॅक प्रा. लि. या कंपनीने १३ विद्यार्थ्यांची निवड केली. पॅकेजिंग क्षेत्रात झालेली तंत्रज्ञानाची प्रगती व बाजारातील वाढती मागणी यामुळे मुद्रण क्षेत्रात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रचंड मागणी निर्माण झाली आहे. ग्रामीण भागातील होतकरू व मेहनती विद्यार्थ्यांसाठी या क्षेत्रात उत्तम करिअर करण्याची संधी आहे.

आजपर्यंत प्रिटिंग डिप्लोमा अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेल्या हजाराहून अधिक विद्यार्थ्यांना बहुराष्ट्रीय कंपन्यातून नोकरीच्या संधी मिळाल्या आहेत. काही विद्यार्थी विदेशात चांगल्या पगाराची नोकरी करीत आहेत. तसेच काही विद्यार्थी स्वतःच्या व्यवसायात यशस्वी झाले आहेत. निवडप्रक्रियेतील कंपनीचे अधिकारी श्री. हेमंत पारसे व श्री.वामसी कृष्णा यांनी विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या व मार्गदर्शन केले.

उपरोक्त निवड झालेल्या यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे विश्वस्त, पदाधिकारी, कर्मचारी व मुद्रण शिक्षण विभागाचे कोर्स-को ऑर्डिनेटर जितेंद्र सोनगिरे, व्यवस्थापक गिरीश केले, मुद्रण शिक्षण विभागप्रमुख प्रा. प्रसाद पुराणिक यांनी विशेष अभिनंदन केले आहे.






कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये सहभागी झालेले संस्थेचे विद्यार्थी




## विद्यार्थ्यांची यशोगाथा

नमस्कार, मी विजय धनराज देसले रा, माळीच ,पोस्ट, गोराणे.तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे येथील रहिवासी. माझे वडील अल्पभूधारक शेतकरी व गावातीलच विनाअनुदानीत हायस्कूलमध्ये (चतुर्थश्रेणी) कर्मचारी म्हणून कार्यरत होते.दोन बहिणी आई वडील व मी असं ५ लोकांचं एक वारकरी संप्रदायातील मध्यमवर्गीय कुटुंब.

माझे दहावीपर्यंतचे शिक्षण गावातच पूर्ण करून पुढील अकरावीचे शिक्षण नरडाणा येथील विकास हायस्कूलमध्ये रोज दहा किलोमीटर सायकल वर जाऊन घेतले. वडिलांची परिस्थिती बेताची असल्यामुळे मी महाविद्यालयीन शिक्षण घेणे टाळले. वडिलांच्या मित्राच्या मुलाने संस्थेतल्या प्रिंटिंग डिप्लोमाला ॲडमिशन घेतली हया अभ्यासक्रमाची माहिती त्याने मला दिली. हे क्षेत्र मला आवडले म्हणून मी सुद्धा या कॉलेजला प्रवेश घेतला व पहिल्या वर्षाची फी तीन टप्प्यात भरली त्यावेळी शासनामार्फत ओबीसी सवलतीचा लाभ मिळत असल्यामुळे कॉलेजकडून दुसऱ्या वर्षाची फी माफ झाली. प्रिंटिंग डिप्लोमा प्रथम श्रेणीत पूर्ण केला पुराणिक सरांच्या मार्गदर्शनाने मी मुंबई (अंबरनाथ) येथे आय एस एम पॅकेजिंग लिमिटेड या कंपनीत नोकरीस लागलो, दोन वर्ष तिथं काम केल्यानंतर मी तेथून एक वर्ष डायना फ्लेक्स प्रायव्हेट लिमिटेड , (बडोदा) ,या कंपनीत जॉइन केले. नंतर मी दोन वर्ष पी. पी. एल लिमिटेड (सिलवासा) गुजरात, या कंपनीत मशीन ऑपरेटर म्हणून कार्यरत होतो. तिथे काम करत असतांना मला दक्षिण आफ्रिका या देशात सिम्फा पॅकेजिंग या कंपनीत बोलावण्यात आले. ती माझ्या आयुष्यातील सुवर्ण संधी होती. तीन वर्ष दक्षिण आफ्रिकेत काम केल्यानंतर मी मुंबईत परतलो येथे २०१८ या वर्षी रेफिनहाऊजर इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (मुंबई) या जर्मन कंपनीमध्ये उप व्यवस्थापक या पदावर सलग सात वर्ष नोकरी केली. या कंपनीमार्फत पूर्ण देशात व विदेशात सुद्धा मार्केटिंग आणि टेक्निशियनची कामे केली माझा या क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव पाहून आता नुकतंच २०/०४/२०२५ पासून मी आम्कॉर प्लेक्सिबल लिमिटेड या ऑस्ट्रेलियातील मोठ्या ग्रुप मधे (Amcor India and Asia Pacific Head of the C.I FLEXO) या पदावरती कार्यरत आहे. मला वार्षिक २० लक्ष रुपयांहून अधिक पॅकेज मिळाले असून माझ्या या संपूर्ण जीवन प्रवासात का. स. वाणी संस्थेचे मोलाचे योगदान आहे . मी या संस्थेचा ऋणी आहे.आज प्रिंटिंग क्षेत्रात गेल्या १५ वर्षा पासून काम करतोय आणि यापुढे देखील करत राहणार आहे. संस्थेच्या भावी वाटचालीस माझ्यातर्फे खूप खूप शुभेच्छा !






## प्रिंटिंग डिप्लोमाच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वाटप

संस्थेचे विद्यमान विश्वस्त मा. श्री विवेक केले व विश्वस्त श्री राजू वाणी (कॅनडा) यांनी प्रत्येकी २० लक्ष निधी उपलब्ध करून दिला असून, या रकमेच्या ठेवीवर मिळणाऱ्या वार्षिक व्याजाच्या रकमेतून आर्थिक दृष्ट्या दुर्बल व गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात यावी असे ठरले होते. त्यानुसार संस्थेचे अध्यक्ष डॉ. के बी पाटील, सचिव प्रा. डॉ. शोभा शिंदे, विश्वस्त श्री जितेंद्र सोनगिरे , शिक्षण विभाग प्रमुख प्रसाद पुराणिक यांच्या कमिटीने ८ फेब्रुवारी २०२५ रोजी विद्यार्थी व पालकांच्या मुलाखती घेऊन प्रथम वर्षाच्या एकूण सहा विद्यार्थ्यांना व द्वितीय वर्षाच्या एकूण दोन विद्यार्थ्यांना सुमारे ७१००० एवढी रक्कम शिष्यवृत्ती स्वरूपात देण्यात आली. गरजू व गरीब विद्यार्थ्यांना या शिष्यवृत्तीचा निश्चितच लाभ झाला. विश्वस्त विवेक केले व विश्वस्त राजू वाणी यांचे विद्यार्थ्यांनी, पालकांनी व मुद्रण शिक्षण विभागाच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले.

# भारतीय मराठी अभ्यास परिषदेचे ३५ वे अधिवेशन संपन्न

३५ वे

भारतीय मराठी अभ्यास परिषदेचे
३५ वे अधिवेशन व राष्ट्रीय चर्चासत्र
दि.२८ फेब्रु. व १ मार्च

का.स.वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था धुळे आणि मराठी अभ्यास परिषद अलिबाग, जि. रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने अलिबाग येथे दि. २८ फेब्रुवारी व १ मार्च २०२५ रोजी ३५ वे अधिवेशन संपन्न झाले.

याप्रसंगी आदिवासी लेखिका नजुबाई गावीत, इतिहास विभागाचे निवृत्त प्राध्यापक डॉ. उमेश बगाडे, का.स.वाणी स्मृति प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री शशिकांत धामणे, सचिव प्रा.डॉ. शोभा शिंदे, संस्थेच्या संचालिका प्रा.डॉ. वंदना महाजन आदी मान्यवर विचारवंतांनी उपस्थिती

उद्घाटन सत्राने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रस्ताविक डॉ. वंदना महाजन यांनी केले. उद्घाटनपर भाषणात कॉम्रेड नजुबाई गावीत यांनी शरद पाटलांच्या क्रांतिकारी जीवनाच्या आढावा घेतनां सांगितले की, शोषण मुक्ती-साठी रात्रभर अभ्यास करणारे आणि दिवसा प्रत्यक्ष आंदोलनात उतरणारे शरद पाटील मी पाहिले आहेत. सध्या समाजात ब्राह्मणी तत्व रूढ होत चालले आहेत, अशा परिस्थितीत डॉ. शरद पाटलांच्या समकालीन पिढीला दुसऱ्या पिढीला एका मांडवाखाली बघून अत्यंत आनंद होत असल्याने सांगितले.

यावेळी का.स.वाणी स्मृती प्रतिष्ठानचे अध्यक्ष सी.ए. शशिकांत धामणे यांनी दोन दिवसात परिषदेच्या चर्चा आढावा घेऊन कॉम्रेड शरद पाटलांच्या मौलिक विचारांचे आणि त्यांच्या विधायक कार्याचे स्मरण करून घडवून आणलेल्या चर्चासत्रात भरभरून शुभेच्छा दिल्यात. यानंतर प्रा. डॉ.उमेश बगाडे यांनी आपल्या बीजभाषणची मांडणी करतांना म्हटले, की शरद पाटील अकॅडमिशन म्हणून तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात उतरले नव्हते तर ते एक जीवनवादी कार्यकर्ते होते. मार्क्सवादी, फुले, आंबेडकरवाद त्यांच्यावर विशेष प्रभाव असल्याचे प्रतिपादन केले. दोन दिवसांच्या ५ सत्रामध्ये सत्रअध्यक्ष डॉ. भारत पाटणकर, डॉ. सुरेश जोंधळे, डॉ. सुधाकर गायकवाड, डॉ. संध्या नरेपवार यांनी अभ्यासक संशोधकांना मार्गदर्शन केले. डॉ. श्रीनिवास हेमाडे, डॉ. राहुल कोसंबी, डॉ. सचिन गरुड, डॉ. संजयकुमार कांबळे, डॉ. धम्मसंगिनी, डॉ. अनिल सपकाळ, डॉ. दिलीप चव्हाण, डॉ. राजेंद्र गोरखकर, डॉ. अश्विनी तोरणे, डॉ. किशोर ढमाडे, प्रा. नारायण भोसले, प्रा. मिशन जगताप यांनी आपले अभ्यासपूर्व संशोधन निबंध सादर केलेत, तर प्रा.डॉ. विनोद कुमरे, प्रा. सुधाकर पाटील, प्रा. सुनील वाघमारे यांनी चर्चक म्हणून भूमिका पार पाडली.

समारोप समारंभाच्या अध्यक्षस्थानी भाषणात जे. एन. यु. विद्यापीठाचे प्रा.डॉ. गोपाळ गुरु यांनी सिद्धांत व तत्त्वज्ञान यातील फरक समजावून बहुप्रवाही ऐतिहासिक भौतिकवादाच्या अन्वेषण पद्धतीने आढावा घेतला. समारोपाचे प्रमुख अतिथी प्रा. डॉ. शोभा शिंदे यांनी शरद पाटील यांचे मार्क्सवाद, आंबेडकरवाद व स्त्रीवादातील योगदान याविषयी अभ्यासपूर्ण विचार मांडले. यावेळी शरद पाटलांच्या साहित्याने व कार्याने प्रभावित झाल्याने त्यांनी सांगितले.

संस्थेच्या संचालिका डॉ. वंदना महाजन यांनी उपस्थित मान्यवर, शोधनिबंधलेखक सत्रअध्यक्ष, संशोधक, प्राध्यापक प्रतिनिधी, संशोधक विद्यार्थी व मराठी परिषदेचे पदाधिकारी या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले. प्रा. प्रसाद पुराणिक, श्री. सुनील देसले व सोनाली अहिरे यांनी परिषद यशस्वी यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले.








## का.स.वाणी संस्थेत धुळे - जळगाव जिल्ह्यातील महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक भेट

केंद्र सरकारच्या नवीन शैक्षणिक धोरणानुसार कार्यप्रशिक्षण अनुभवांतर्गत अभ्यासक्रमानुसार एम.ए. च्या (भाग १) विद्यार्थ्यांनी फेब्रुवारी- मार्च- एप्रिल महिन्यात शैक्षणिक भेट दिली. यात एस.पी.डी.एम. शिरपूर महाविद्यालयातील एम. .ए (मराठी भाग १) विभागातील ११ विद्यार्थी व ४ प्राध्यापक, किसान महाविद्यालय, पारोळा येथील १० विद्यार्थी व ३ प्राध्यापक, प्रताप महाविद्यालय, अमळनेर १२ विद्यार्थी व ३ प्राध्यापक, चौधरी कला, वाणिज्य विद्यालय - कुसुंबा जि. धुळे, विद्यावर्धिनी महाविद्यालय, धुळे येथील एम. ए. मराठीचे १० विद्यार्थी व ३ प्राध्यापक इत्यादी महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापकांनी संस्थेच्या विविध विभागांना भेट देऊन संस्थेच्या उपक्रमांविषयी व प्रकल्पाविषयी माहिती जाणून घेतली.

मुद्रण विभागातील प्रा. प्रसाद पुराणिक यांनी विद्यार्थ्यांना संस्थेची सविस्तर माहिती दिली. ग्रंथपाल श्री. मिलिंद दीक्षित यांनी ग्रंथालयातील संदर्भ पुस्तकांची व दुर्मिळ ग्रंथांची माहिती दिली. यावेळी एस.पी.डी.एम.महाविद्यालयाचे उपप्राचार्य व साहित्यिक डॉ. फुला बागुल, विद्यावर्धिनी महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख डॉ. प्रशांत लगडे, कुसुंबा महाविद्यालयाचे प्रा. डॉक्टर जितेंद्र गिरासे, डॉ. बी.बी. गायकवाड, प्रताप महाविद्यालयाचे प्रा. डॉ. रमेश माने यांनी संस्थेच्या प्रकल्पाविषयी माहिती जाणून घेतली व संस्थेच्या विधायक कार्यक्रमाविषयी समाधान व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी ही विविध विभागांना भेट देऊन आपली जिज्ञासापूर्ती केली.





शैक्षणिक भेट, धुळे- जळगाव जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील विद्यार्थी.

## प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

देशाला सार्वभौमत्व मिळून ७६ वर्षे पूर्ण झालीत, नुकताच स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव संपूर्ण देशात साजरा करण्यात आला. त्याच प्रमाणे आपल्या संस्थेत देखील २६ जानेवारी २०२५ हा ७६ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी संस्थेचे विश्वस्त मा. श्री. जितेंद्र सोनगिरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करून राष्ट्र ध्वजाला मानवंदना देण्यात आली. या वेळी संस्थेचे सर्व पदाधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.





# रेऊ वाणी विज्ञान विहार

## 'पौगंड अवस्थेतील जाणीव' कार्यशाळा संपन्न

का. स .वाणी स्मृती प्रतिष्ठान संचलित रेऊ वाणी विज्ञान विहार व आजीवन अध्ययन व विस्तार शिक्षण विभाग क.ब.चौ. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव तर्फे विद्यार्थ्यांसाठी दिनांक २४ जानेवारी २०२५ रोजी 'पौगंड अवस्थेतील जाणीव' या विषयावर कार्यशाळा संपन्न झाली. उद्घाटन मा. प्रा. प्रकाश पाठक यांनी केले ते म्हणाले की योग्य वयात योग्य मार्गदर्शन मिळाले तरच पुढे चांगले व्यक्तिमत्व घडू शकेल. मनामध्ये सेवेचा व त्यागाचा भाव तयार केला पाहिजे, कीर्तीवान होण्यापेक्षा नीतिमान व्हावे कोणाचे तरी आदर्श व्हा, गुणवान व्हा या शब्दात त्यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी डॉक्टर अभिनय दरवडे म्हणाले की बुद्धी पुस्तकीय नको तर सामाजिक असली पाहिजे. वयामध्ये होणारे बदल त्यावर मेंदूमध्ये असलेली लिम्बिक संस्थेचे नियंत्रण याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. प्रथम सत्रात प्रा. डॉ. शोभा शिंदे यांनी ' शिका कसे शिकावे' ते या विषयावर मार्गदर्शन करताना अभ्यासाची कौशल्ये सांगितली. विषयाचे आकलन करून घेणे, प्रभावी वाचन करणे, अचूक नोट्स काढणे, वेळेचा सदुपयोग करणे , इत्यादी मुद्दे समजावून सांगितले.

द्वितीय सत्राच्या मार्गदर्शिका डॉ. विभा इंदानी यांनी 'मानसिक आरोग्याचे तीन स्तंभ' या विषयावर मार्गदर्शन केले त्या म्हणाल्या की विचार भावना व वर्तन हे मानसिक आरोग्याचे तीन स्तंभ आहेत तसेच त्यांनी कॉग्निटीव्ह त्रिकोण समजावून सांगितला. तिसऱ्या सत्रात डॉक्टर तुषार भट यांनी पौगंड अवस्थेतील शारीरिक व मानसिक बदल समजावून सांगितले त्या अनुषंगाने मुला-मुलींमध्ये निर्माण होणाऱ्या भावना व त्यावर नियंत्रण कसे ठेवावे याबाबत मार्गदर्शन केले. सदर कार्यशाळेत १३५ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. विद्यार्थी व पालकांनी कार्यशाळेबद्दल सकारात्मक प्रतिक्रिया नोंदवल्या.







'पौगंड अवस्थेतील जाणीव' कार्यशाळेचे मान्यवर

## रेऊ वाणी विज्ञान विहारात विज्ञान सप्ताहाचे आयोजन

का. स. वाणी स्मृती प्रतिष्ठान संचलित रेऊ वाणी विज्ञान विहारात दरवर्षाप्रमाणे यावर्षीही विज्ञान सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते दिनांक २८ फेब्रुवारी २०२५ रोजी राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्ताने प्रा. डॉ. महेंद्र शिंदे यांच्या हस्ते विज्ञान सप्ताहाचे उद्घाटन करण्यात आले यावेळी प्रमुख अतिथी म्हणून "प्रिन्स" या प्रकल्पाचे संस्थापक मा.श्री अजय चांडक उपस्थित होते. डॉ. शिंदे यांनी क्लासिकल मॅथेमॅटिक्स व क्वांटम मेकॅनिक्स यामधील फरक समजावून सांगितला क्लासिकल मॅथेमॅटिक्स मध्ये वस्तूंच्या गती बद्दल अभ्यास केला जातो यामध्ये न्यूटनचे गती विषयक नियमांचा अभ्यास केला जातो. तर क्वांटम मेकॅनिक्स मध्ये पदार्थ व ऊर्जा यामधील अणु स्तरावरील संबंधांचा अभ्यास केला जातो भविष्यात २०४७ पर्यंत ७७ पेटा होप्स चा संगणक बनविणे हे विकसित भारताचे ध्येय असेल असेही ते म्हणाले.

प्रा. चांडक यांनी कोणत्याही गोष्टीवर आंधळेपणाने विश्वास न ठेवता प्रत्येक गोष्ट विज्ञानाच्या कसोटीवर तपासून बघायला पाहिजे असे सांगितले. प्रास्ताविक व आभार डॉ.दिपाली महाजन यांनी केले. यावेळी विविध शाळेतील शंभर पेक्षा जास्त विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.




## रेऊ वाणी विज्ञान विहार तर्फे मराठी भाषा गौरव दिन साजरा

का. स. वाणी स्मृती प्रतिष्ठान संचलित रेऊ वाणी विज्ञान विहार तर्फे २७ फेब्रुवारी २०२५ रोजी मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन उपजिल्हाधिकारी मा. श्री नितीन गावंडे यांच्या हस्ते झाले यावेळी अध्यक्षीय भाषणात गावंडे म्हणाले की कला कोणतीही असू द्यात ती समाजाला दिशा देत असते. समाजात स्थैर्य प्रस्थापित करीत असते. चंगळवादी व्यवस्थेकडे न जाता स्वतःला पॅकेजमध्ये न गुंतवता आपली आवड जोपासावी , वाढत न्यावी . यावेळी नवलेखकांचा हस्तलिखित कवितासंग्रह माननीय गावंडे यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आला.

मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून नव लेखकांसाठी कार्यशाळेचे आयोजनही करण्यात आले होते. सदर कार्यशाळेत मा. प्रा. उषा पाटील आणि मा. प्रा.डॉ.सदाशिव सूर्यवंशी यांनी मार्गदर्शन केले. डॉ. सूर्यवंशी यांनी पद्य व पद्याचे विविध प्रकारांची ओळख करून दिली. काव्य लेखन कसे करावे आणि त्याचे प्रकार याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले, तर प्रा.उषा पाटील यांनी गद्य व गद्याचे विविध प्रकारांची ओळख करून दिली.यावेळी नव लेखकांसाठी स्वलिखित कविता सादरीकरण स्पर्धा घेण्यात आली. प्रा.डॉ. ज्योती बोरकर व प्रा. रंजना खैरनार यांनी स्पर्धेचे परीक्षण करून मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचा समारोप समारंभ ह. भ.प.मा. प्रा. डॉ. वृंदा निफाडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. मान्यवरांच्या हस्ते यशस्वी स्पर्धकांना पारितोषिक देवून गौरवण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सौ वैशाली सोनगिरे यांनी केले तर आभार डॉ. दिपाली महाजन यांनी मानले .



# बालनेत्र सुरक्षा प्रकल्प

जानेवारी ते मार्च या दरम्यान १८ गावे व ५९ शाळांमध्ये एकूण ७९२० विद्यार्थ्यांची मोफत नेत्रतपासणी करण्यात आली. तपासणी दरम्यान ३७७ मुलांची रेफर करण्यात आले व ५७ विद्यार्थ्यांना तिरळेपणा असल्याचे निदर्शनास आले.

**तपासणी अहवाल तक्ता**

| | जानेवारी ते मार्च २०२५ | ३१ मार्च २०२५ पर्यंत |
|---|---|---|
| Screened | ७९२० | १२६९२७ |
| Spect (School Camp) | ० | १६७ |
| Refer (School) | ३७७ | ५९८७ |
| Visited | ४५ | ६८४ |
| Surg. Suggested | ३ | ५९ |
| Surg. Done | ० | ३८ |
| G.P. given (S.N.) | २० | ३५४ |
| Higher Centre | ० | १६ |
| Patch | २ | ३७ |
| Cornea / Retina | २ | १३ |
| Follow Up / medicine given | ४ | २३ |



शाळेमधील नियमित तपासणी करताना

उडाणे येथील आश्रम शाळेतील व कुंडाणे येथील जिल्हा परिषद शाळेतील रेफर विद्यार्थ्यांना प्रकल्पाच्या व्हॅन मध्ये शारदा नेत्रालय येथे आणण्यात आले..तपासणी नंतर चष्मा नंबर निघालेल्या २ विद्यार्थ्यांना प्रकल्पाद्वारे मोफत तर एका विद्यार्थ्याला सवलतीच्या दरात चष्मा देण्यात आला.




प्रकल्पाच्या व्हॅन मध्ये शारदा नेत्रालय येथे आणलेले व चष्मा दिलेले विद्यार्थ

दि. १९फेब्रुवारी २०२५ रोजी ए. बी. फौंडेशन तर्फे शिवाजी महाराज जयंती निमित्त आरोग्य तपासणी शिबिर आयोजित केले होते. या शिबिरात एकूण ११० (९६ जेष्ठ नागरिक व१४ शालेय विद्यार्थी ) यांची मोफत नेत्र तापसणी करण्यात आली. तपासणी दरम्यान ४४ ( ३९ जेष्ठ नागरिक व ५ शालेय विद्यार्थी) यांना रेफर करण्यात आले. तर ३३ ( ३२ जेष्ठ नागरिक व १ शालेय विद्यार्थी) चष्मा नंबर काढून देण्यात आला व २१ ( १९ जेष्ठ नागरिक व २ शालेय विद्यार्थी). आतापर्यंत ५ जेष्ठ नागरिक शारदा नेत्रालयात येवून गेले त्यापैकी एकाचे मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आली व ३ जणांना शस्त्रक्रियेचा सल्ला देण्यात आला तसेच एकाला चष्मा नंबर काढून देण्यात आला



एफौंडेशन तर्फे शिवाजी महाराज जयंती निमित्त आरोग्य तपासणी शिबिरामध्ये नेत्र तपासणी करताना बालनेत्र ची टीम

# स्किझोफ्रेनिया अवेअरनेस असोसिएशन संस्था, पुणे

## मकर संक्रांती साजरी

जॉय ऑफ गिव्हिंग उपक्रमांतर्गत १५ जानेवारी रोजी सा शुभार्थी संस्थेच्या वतीने दृष्टीहीन वृद्धाश्रमामध्ये एकमेकांना तिळगुळ देऊन मकर संक्रांती साजरी करण्यात आली. या उपक्रमाचा उद्देश वृद्धांना आनंद देणे आणि आनंदाचे क्षण वाटणे हा होता. या वेळी सा च्या उपाध्यक्षा आणि खजिनदार सौ. नीता कोपारकर व सौ. आरती पंडित उपस्थित होत्या.



## ओरिएंटेशन भेट आयोजित

२८ जानेवारी रोजी डॉ. डी. वाय. पाटील कॉलेजच्या MA मानसशास्त्र विभागातील ३० विद्यार्थ्यांसाठी ओरिएंटेशन भेट आयोजित करण्यात आली. हे सत्र सचिव श्री. रवींद्रनाथ आणि सौ. सारिका चंडक यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले.




२७ मार्च रोजी मिलेनियम स्कूलच्या १२वी इयत्तेच्या विद्यार्थ्यांसाठी ओरिएंटेशन भेट आयोजित करण्यात आली. सत्राचे मार्गदर्शन सा चे विश्वस्त श्री. अमृत बक्षी, सौ. आरती पंडित आणि सौ. सारिका चंडक यांनी केले.



२९ मार्च रोजी सा संस्थेने FLAME विद्यापीठाच्या मानसशास्त्र विभागातर्फे आयोजित ३८व्या राष्ट्रीय मानसशास्त्र परिषदेतील प्रदर्शनात सहभाग घेतला.



# शारदा नेत्रालय उपक्रम



## शारदा नेत्रालयासाठी स्वर्गीय जितूभाईंचे मरणोत्तर योगदान

स्वर्गीय जितुभाईंनी आपल्या इच्छापत्रात शारदा नेत्रालयासाठी रुपये 50 लक्ष एवढे भरीव आर्थिक योगदान देणगी स्वरूपात देण्याची योजना करून ठेवलेली होती त्यानुसार त्यांनी दिलेल्या देणगी रकमेच्या ठेवीवर मिळणाऱ्या वार्षिक व्याजाची रक्कम खर्च करण्यासाठी वापरण्यात येणार आहे. आदरणीय जितू भाईंचे शारदा नेत्रालयासाठी मरणोत्तर योगदान देखील खूप मोलाचे आहे.

## शारदा नेत्रालयाची नेत्रदीपक कामगिरी

मार्च २०२५ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षात पुन्हा एकदा शारदा नेत्रालयाने ११,०००+ शस्त्रक्रिया (शस्त्रक्रिया + ओटी प्रक्रिया + ओपीडी प्रक्रिया) ओलांडली आहे. यापूर्वी मागील तीन वर्षामध्ये देखील ११,०००+ शस्त्रक्रिया (शस्त्रक्रिया + ओटी प्रक्रिया + ओपीडी प्रक्रिया) पार करण्यात आल्या होत्या.

या वर्षात नेत्रालयाकडे आठ महिन्यांसाठी (२४ एप्रिल ते २४ नोव्हेंबर) फक्त दोनच सर्जन सेवेत कार्यरत होते. डिसेंबरमध्ये आणखी दोन डॉक्टर सामील झाले. डॉक्टरांची संख्या वाढल्यामुळे पुढील वर्षात याहीपेक्षा उत्तुंग कामगिरी करता येईल असा विश्वास वरिष्ठांनी व्यक्त केला.

### शारदा नेत्रालय OPD रिपोर्ट

**OPD DETAILS**

| Period | Paid | Review Free | Express OPD | Subsidzed | Retina OPD | Paediatric OPD | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1st Jan'25 to 31st March'25 | 10296 | 4062 | 549 | 1171 | 779 | 104 | *16961* |

**OT DETAILS (Surgery Details)**

| Period | SICS Free | SICS Paid | Phaco | Retina | Other | Paediatric | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1st Jan'25 to 31st March'25 | 733 | 335 | 1539 | 60 | 887 | 2 | *3556* |

**का. स. वाणी स्मृति प्रतिष्ठान, धुळे**

**विद्यमान विश्वस्तांची यादी**

मा.सी.ए.श्री.शशिकांत धामणे (अध्यक्ष)

मा. प्रा.डॉ. शोभा शिंदे (सचिव)

मा. डॉ.के.बी. पाटील

मा. श्री. श्रीराम जगन्नाथ वाणी

मा. प्रा.डॉ. नटवरलाल जैन

मा. श्री. श्रीपाल मुणोत

मा. श्री. विवेक केले

मा. श्री. जितेंद्र सोनगिरे

**We accept donations from well-wishers**

K.S.Wani Memorial Trust
IDBI Bank, Dhule (Maharashtra)
Current Account No. 48310010006917
IFSC Code IBKL0000483

---------------------------

K.S. Wani Memorial Trust.
FCRA Reg. No. 083820024
PAN No. AAATK9380K

---------------------------

**Contact:** K. S. Wani Memoral Trust,
Unnati Nager Nakane Road Deopur Dhule- 424002
(02562)223654, 9372810477
Email Id: kswmarathi@gmail.com
Please Visit: www.kswtrust.org